# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः 13.07.2024** **वारः शनिवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मुंबई दौऱ्यावर
2. पंतप्रधानांच्या हस्ते आज मुंबईतील 29 हजार 400 कोटी रुपयांच्या प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण
3. नीती आयोगाचा 2023-24 वर्षासाठीचा शाश्वत विकास उदिष्ट निर्देशांक जारी
4. प्रसार भारती आणि आयआयटी दिल्लीच्या वतीनं आजपासून 'DD-Robocon' India 2024 चं आयोजन आणि
5. पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेसाठी भारतीय खेळाडूंची यादी जाहीर

**पंतप्रधान मुंबई भेट**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मुंबईला भेट देणार आहेत. गोरेगावमधील नेस्को एक्झिबिशन सेंटर इथं ते आज रस्ते, रेल्वे आणि बंदर क्षेत्राशी संबंधित 29 हजार 400 कोटीहून अधिक मूल्य असलेल्या विविध प्रकल्पांचं उद्घाटन, लोकार्पण तसंच पायाभरणी करणार आहेत. तर, आज संध्याकाळी ते भारतीय वृत्त सेवा सचिवालयाच्या मनोऱ्याचं उद्घाटन करतील.

ठाणे बोरिवली बोगदा प्रकल्पाची पायाभरणी आज पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे. हा जुळा बोगदा प्रकल्प ठाणे आणि बोरिवली दरम्यान संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या खालून जाणार असून तो बोरीवलीच्या बाजूला पश्चिम द्रुतगती महामार्गाला तर ठाण्याकडे घोडबंदर रस्त्याला थेट जोडला जाईल. यामुळे ठाणे ते बोरिवली प्रवासाची वेळ 1 तासानं कमी होईल.

पंतप्रधान गोरेगाव मुलुंड लिंक रोड प्रकल्पाची देखील पायाभरणी करणार आहेत. तसंच नवी मुंबईतील तुर्भे इथं कल्याण यार्ड पुनर्रचना आणि गती शक्ती मल्टी मॉडेल कार्गो टर्मिनल या प्रकल्पांची पायाभरणी पंतप्रधानांच्या हस्ते होईल.

लोकमान्य टिळक टर्मिनसच्या नव्या फलाटांचं तसंच छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या 10 आणि 11 क्रमांकाच्या फलाटाच्या नव्या विस्तारीत भागाचं लोकार्पण देखील मोदी यांच्या हस्ते होणार आहे. लोकमान्य टिळक टर्मिनसच्या नव्या लांब फलाटांमुळे इथे मोठ्या लांबीच्या रेल्वे थांबवता येतील यामुळे प्रत्येक रेल्वेगणिक अधिकाधिक प्रवाश्यांना प्रवासाचा लाभ घेता येईल.

मुख्यमंत्री युवा कार्य योजनेचं उद्घाटनही आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. तरूणांमधील बेरोजगारीची समस्या दूर करण्यासाठीच्या या आंतरवासीता योजनेमुळे 18 ते 30 वर्ष वयोगटातील युवकांना कौशल्य विकासाची तसंच उद्योग क्षेत्रात प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

**नीति**

नीति आयोगानं काल 2023-24 साठीचा SDG इंडिया इंडेक्स अर्थात शाश्वत विकास उदिष्ट निर्देशांक जारी केला. नीति आयोगाचे मुख्य कार्यकारी आधिकारी बीव्हीआर सुब्रह्मण्यम आणि नीति आयोगाच्या उपाध्यक्षा सुमन बेरी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा निर्देशांक जारी करण्यात आला. जागतिक पातळीवर संकटे असूनही भारत शाश्वत विकास उद्दिष्टांकडे प्रगती करत असून हा निर्देशांक 2023-24 मध्ये 71 वर गेला आहे. देशातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांची प्रगती मोजण्यासाठी हा निर्देशांक वापरला जातो.

**संविधान हत्या दिवस**

केंद्र सरकारनं दरवर्षी 25 जून हा दिवस संविधान हत्या दिवस म्हणून पाळण्याचं ठरवलं आहे. या दिवशी 1975 यावर्षी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली होती. केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी काल समाज माध्यमावर संदेश प्रसारित करत याबद्दल माहिती दिली. त्यांनी या संदेशात म्हटलं आहे की, लोकशाही वाचवण्यासाठी ज्या लाखों लोकांनी या दडपशाही विरुद्ध आवाज उठवला आणि तत्कालीन हुकुमशाहीचा छळ सहन केला त्यांना आदरांजली म्हणून हा दिवस साजरा करण्यात येणार आहे. संविधान हत्या दिवस पाळल्यानं प्रत्येक भारतीयाच्या मनात व्यक्तिस्वातंत्र्याची आणि देशाच्या लोकशाही रक्षणाची ज्योत सतत तेवती राहील.

**रोबोकॉन**

प्रसार भारती आणि आयआयटी दिल्ली यांच्यावतीनं आजपासून दिल्लीत 'DD-Robocon' India 2024 चं आयोजन करण्यात आलं आहे. या दोन दिवसीय स्पर्धेत देशातील 45 हून अधिक महाविद्यालये, संस्था आणि विद्यापीठांमधील 750 हून अधिक विद्यार्थी सहभागी होत आहेत. डीडी-रोबोकॉनमधील विजेता संघ व्हिएतनाममधील क्वांगनिन्ह इथं होणाऱ्या आंतरराष्ट्रीय एशिया-पॅसिफिक ब्रॉडकास्टिंग युनियन रोबोकॉन 2024 मध्ये भारताचं प्रतिनिधित्व करेल.

**ग्रामीण रस्ते**

ग्रामीण भागातील दळणवळण सक्षम करण्यासाठी आणि ईशान्येकडील प्रदेशातल्या आर्थिक विकासाला गती देण्यासाठी केंद्र सरकारनं त्रिपुरा आणि आसामसाठी अनेक रस्ते प्रकल्प मंजूर केले आहेत. ग्रामीण विकास मंत्रालयानं आसामसाठी प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत 563 किलोमीटर लांबीचे 78 रस्ते आणि 14 पूल मंजूर केले आहेत. तर त्रिपुरासाठी 118 किलोमीटरचे 42 रस्ते मंजूर केले आहेत. या रस्तेप्रकल्पांमुळे दुर्गम भागातली गावं आणि शहरी भागातलं अंतर कमी होण्यास मदत मिळेल, तसंच आरोग्य सेवा, शिक्षण आणि बाजारपेठेसारख्या सुविधांचा लाभ घेणं सुकर होईल. आदिवासी समाजाची आर्थिक सामाजिक स्थिती सुधारण्यासाठीही या रस्तेप्रकल्पांची मदत होईल.

**काश्मीर मंदिर**

जम्मू-काश्मीर केंद्रशासित प्रदेशातील दक्षिण काश्मीरमधल्या अनंतनाग जिल्ह्यातलं देवी उमा भगवतीचं एक प्राचीन मंदिर 34 वर्षांनंतर उद्या पुन्हा उघडण्यात येणार आहे. काश्मीर खोऱ्यातील प्रतिकूल परिस्थितीमुळे 1990 मध्ये हे मंदिर बंद करण्यात आलं होतं. मात्र, आता परिस्थिती बदलल्यामुळे परिसरातील स्थानिक मुस्लिम जनतेच्या पाठिंब्यानं हे मंदिर उद्या पुन्हा उघडणार आहे. देवी उमा भगवती ही काश्मिरी पंडितांची प्रमुख देवता असून जम्मू-काश्मीरच्या विविध भागातून भाविक इथं मोठ्या संख्येनं येत असत. या मंदिराच्या आवारातील ब्रारी आंघन इथं पंचमुखी हनुमानाच्या मूर्तीचीही प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे.

**आयुष्यमान**

केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांनी काल नवी दिल्ली इथं राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी झालेल्या बैठकीत आयुष्यमान भारत प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत आयुष्यमान भारत डिजिटल अभियानाचा आढावा घेतला. नड्डा म्हणाले कीं, या दोन्ही योजना आपापली उद्दिष्टे यशस्वीरीत्या पूर्ण करत आहेत. एक लाख कोटी रुपयांहून अधिक मूल्य असलेल्या आरोग्य सुविधा या योजनेअंतर्गत नागरिकांना पुरवण्यात आल्याचं नड्डा म्हणाले. समाजातील उपेक्षित आणि गरजू लोकांना या दूरदर्शी योजनेचे लाभ मिळावेत यांची दक्षता घेण्याचे निर्देश नड्डा यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिले.

**उत्पादन निर्देशांक**

देशातील औद्योगिक उत्पादन निर्देशांकात यंदाच्या मे महिन्यात मागच्या वर्षीच्या तुलनेत 5 पूर्णांक 9 टक्क्यांनी वाढ झाली आहे. गेल्या वर्षी मे महिन्यात हा दर 5 पूर्णांक 7 टक्के होता. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयानं यासंदर्भातील आकडेवारी काल जाहीर केली. खाणकाम क्षेत्रात दरवर्षी वाढ होत असून यंदा 6 पूर्णांक 6 टक्क्यांची वाढ झाली आहे. निर्मिती क्षेत्रात 4 पूर्णांक 6 टक्के तर वीज क्षेत्राचा उत्पादन वाढीचा दर 13 पूर्णांक 7 टक्के इतका लक्षणीय नोंदवला गेला.

**टी-ट्वेंटी**

भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातल्या पुरुष संघाच्या टी-ट्वेंटी क्रिकेटमध्ये पाच सामन्यांच्या मालिकेतला चौथा सामना आज संध्याकाळी हरारे इथं होणार आहे. भारतीय संघ या मालिकेत 2 सामने जिंकून आघाडीवर आहे. मालिकेतील अंतिम सामना उद्या हरारे इथल्या मैदानावर होणार आहे.

**टेनिस- विंबल्डन**

विम्बल्डन टेनिसमध्ये आज संध्याकाळी महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात सातव्या मानांकित जास्मिन पाओलिनीची लढत 31 वी मानांकित बार्बरा क्रेचिकोव्हाशी होणार आहे. चेक प्रजासत्ताकच्या क्रेचिकोव्हाने विम्बल्डनच्या अंतिम फेरीत प्रथमच प्रवेश केला आहे. पुरुष एकेरीत, सात वेळचा चॅम्पियन नोव्हाक जोकोविच उद्या गतविजेता कार्लोस अल्काराझशी सामना करणार आहे. सर्बियाच्या जोकोविचने काल झालेल्या उपांत्य फेरीत इटालियन लोरेन्झो मुसेट्टीविरुद्ध 6-4, 7-6, 6-4 असा सरळ विजय मिळवला. अल्काराझने उपांत्य फेरीत रशियाच्या डॅनिल मेदवेदेवचा 6-7, 6-3, 6-4, 6-4 असा पराभव करून स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा अंतिम फेरी गाठली. पुरुष दुहेरीच्या विजेतेपदाच्या लढतीत, हेन्री पॅटन आणि हॅरी हेलिओवारा या ब्रिटिश-फिनिश जोडीचा सामना आज संध्याकाळी मॅक्स पर्सेल आणि जॉर्डन थॉम्पसन या ऑस्ट्रेलियन जोडीशी होईल. महिला दुहेरीच्या अंतिम फेरीत, कॅनडाची गॅब्रिएला डब्रोव्स्की आणि न्यूझीलंडची एरिन राउटलिफ या द्वितीय मानांकित जोडीचा सामना आज रात्री चेक प्रजासत्ताकच्या कॅटेरिना सिनियाकोवा आणि अमेरिकेच्या टेलर टाउनसेंड या जोडीशी होईल. मिश्र दुहेरीच्या अंतिम फेरीत,

सातवी मानांकित पोलिश-तैवान जोडी जॅन झिलिंस्की आणि हसिह सु-वेई उद्या मेक्सिकन जोडी सँटियागो गोन्झालेझ आणि जिउलियाना ओल्मोस यांच्यात सामना होणार आहे.

**ऑलिम्पिक-खेडाळू यादी**

क्रीडा विश्वाची पंढरी समजल्या जाणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेसाठीच्या भारतीय खेळाडूंची यादी काल जाहीर झाली. पॅरिस इथं 26 जुलैपासून सुरू होणाऱ्या या ऑलिम्पिक स्पर्धेत भालाफेकपटू नीरज चोप्राच्या नेतृत्वाखालील भारतीय तुकडीत 28 खेळांडूंचा समावेश असणार आहे. यामध्ये 11 महिला आणि 17 पुरुष खेळाडू आहेत. यंदाच्या या ऑलिम्पिक स्पर्धेत सहभागी होणारा सर्वात कमी वयाचा खेळाडू हा 16 वर्षांचा तर सर्वांत ज्येष्ठ  खेळाडू हा 47 वर्ष वयाचा आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.

#